
# REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5. 7631(UIF)


## स्थानिक ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्व आणि संवर्धन


**Dr. Suresh Maruti Chavan**
**Head, Department of History , A.C.S. College Gadhinglaj,**
**Dist. Kolhapur. Maharashtra.**


**प्रस्तावना :**



कोणत्याही राष्ट्राचा समृद्ध वारसा हा त्या देशाच्या इतिहासावर अवलंबून असतो. तर ऐतिहासिक पर्यटन हे त्या देशाच्या उज्वल इतिहासाचे महत्त्वाचे अंग असते. म्हणजेच पर्यटनामुळे इतिहास जीवंत राहतो तर इतिहासामुळे राष्ट्र जीवंत राहते. भारताच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास या देशाच्या ऐतिहासिक पर्यटनात स्थानिक पर्यटनाचा अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. कोणतेही ऐतिहासिक पर्यटनस्थळ हे प्रथम स्थानिक पर्यटनाचा भाग असतो. त्यामुळेच स्थानिक ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्व अधिक असते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कोल्हापूर जिल्हयाच्या दक्षिण भागातील ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्व विषद करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जसे की, शेकडो वर्षे शत्रुंचे हल्ले आपल्या छाताडावर झेलुन या भागाचे संरक्षण करणारा ऐतिहासिक सामानगड, महाराष्ट्र व कर्नाटकातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असणारे श्री काळभैरव मंदिर या भागाचे विलोभनीय दर्शन देऊन मनाला भुरळ घालणारा ऐतिहासिक गुड्डाईचा डोंगर आणि अतुल पराक्रमाने नेसरीची खिंड पावन करणाऱ्या सरसेनापती प्रतापराव गुर्जर यांचे स्मारक हे स्थानिक पर्यटनाची साक्ष देणारी चालती बोलती उदाहरणे आहेत. असे असले तरी कोणत्याही भागाचे स्थानिक पर्यटन हे आजघडीला भग्न होताना दिसत आहे. म्हणून या ऐतिहासिक पर्यटनाचे संवर्धन होणेही तितकेच महत्वाचे आहे.

**गडहिंग्लज परिसराची ओळख :**

भौगोलिकदृष्टया विचार करता गडहिंग्लजच्या पूर्वेला संकेश्वर, पश्चिमेला आजरा-गारगोटी दरम्यानचा भूप्रदेश, दक्षिणेला हिरण्यकेशी नदी आणि उत्तरेला ग्रामदैवत श्री काळभैरीचे जागृत देवस्थान आहे. गडहिंग्लजच्या निर्मिती व नावाबद्दल अनेक अख्यायिका सांगितल्या जातात जसे की, ज्याच्या छताखाली हे शहर वसले आहे तो सामानगड जेव्हा प्रथम जिंकला गेला तेव्हा लोकांनी गड जिंकला..... गड जिंकला... अशा आनंदाने आरोळया दिल्या. त्यातूनच गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गावाला गडहिंग्लज असे नाव मिळाले. दुसरी अख्यायिका अशी सांगितली जाते की, 'चिकोडी' तालुक्यातील 'इंग्लज' याच्यापासून वेगवेगळपण दाखविण्यासाठी गडाच्या सान्निध्यामध्ये येथील 'इंग्लज' ला गडहिंग्लज (गडइंग्लज) तर चिकोडी तालुक्यातील 'इंग्लजला' 'नाइंग्लज' असे नाव देण्यात आले.' तर काहींच्या मते, 'गुड्डादेवीच्या सानिध्यामुळे या गावास गुडहिंग्लज असे म्हणत असत. त्याचाच पुढे अपभ्रंश गडहिंग्लज असा झाला. एकूणच गडहिंग्लजच्या नावाबाबत विचार करता सामानगडाच्या कुशीत हे गाव वसले असल्यामुळे याचे नांव गडहिंग्लज असे पडले असावे याबाबत अनेक अभ्यासकांचे एकमत असलेले दिसून येते.[१]

गडहिंग्लजच्या निर्मितीसंदर्भात असे मानले जाते की, पूर्वीचे गडहिंग्लज हे हाळलक्ष्मी परिसरात वसले होते. पण पाण्याच्या सोयीसाठी पुढे ते नदीकाठावर सरकले. पुढे निपाणीकर-पटवर्धनांच्या अनेक स्वाऱ्यांचा त्रास गडहिंग्लजकरांना सोसावा लागला होता. सुमारे ४०० वर्षापूर्वीचा गडहिंग्लजमध्येही एक किल्ला असून तो कापशीच्या घोरपडे घराण्यातील एका पराक्रमी पुरुषाने बांधला होता. त्याच्या सभोवताली असणाऱ्या खंदकाचे काही भाग आजही जुन्या वसाहतीत असल्याचे मानले जाते. इ.स. १८५४ पर्यंत तालुक्याचे ठिकाण सामानगडावर तर कचेरीचे ठिकाण कडगांव येथे होते. पण १८५४ साली तालुक्याचे ठिकाण व कचेरी गडहिंग्लज हालविण्यात आली.[२]

अस्वस्थ होते. म्हणून स्वतंत्र भारतातील नव्या पिढीने स्वतंत्र भारताच्या संपन्न भविष्याचे पाईक व्हावे एवढाच आशावाद वाटतो." यावरुन उज्वल ऐतिहासिक वारश्याच्या संवर्धनाचे भयंकर वास्तव समोर येते.[13]

**समारोप :**

स्थानिक भागापासून ते देशापर्यंत आपल्याला समृद्ध इतिहासाचा वारसा लाभला आहे. हा इतिहासच खऱ्या मार्गाने भविष्याचा वाटाडया असतो. कारण ज्याचा इतिहास उज्वल त्याचे भविष्यही तितकेच उज्वल असते असा इतिहासाचा दाखला आहे. पण सद्या त्याच इतिहासाच्या खानाखुणांचे अर्थात पर्यटन स्थळांचे फक्त स्मरण करुन चालणार नाही तर त्याचे तेवढयाच तत्परतेने संवर्धनही होण्याची नितांत गरज आहे. पण समाजातील बहुतांशी घटक स्वत:च्या स्वार्थासाठी कोणत्या ना कोणत्या कारणाने ऐतिहासिक पर्यटन स्थळे नष्ट करत आहेत. जुन्यापेक्षा नव्याला महत्त्व देण्याची प्रवृत्ती, पैशाला दिले जाणारे अवाजवी महत्त्व, समाजाची बदलणारी मानसिकता (व्यवहारीकता) आणि इतिहासाबद्दलचे अज्ञान यासारख्या विविध कारणांमुळे ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनात अडथळे निर्माण होत आहेत. आपल्या उज्वल इतिहासाचा हा ऐतिहासिक वारसा जर आपण असाच ऱ्हास होऊ दिला तर एक दिवस हा देश ऐतिहासिक वारश्याशिवाय पहाण्याचे दुर्भाग्य नव्या पिढीच्या नशिबी आल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच आजच्या सामाजाने अर्थात तरुण पिढीने किंवा प्रत्येक जणांने भविष्यातील विकासाचे पाऊल टाकत असताना देशाच्या गौरवशाली ऐतिहासिक पाऊल खुनांचे संवर्धन करुनच टाकले पाहिजे.

**संदर्भग्रंथसूची :**

१) हिरण्यकेशीच्या काठी, गडहिंग्लज नगरपरिषद शताब्दी स्मृतीग्रंथ (१८८७-१९८७), गडहिंग्लज नगरपरिषद, गडहिंग्लज १९८७.
२) दैनिक सकाळ- गडहिंग्लज कार्यालय वर्धापन दिन विशेषांक, दिनांक ३०/११/२००५.
३) मुलाखत : श्री गरुव (पुजारी) काळभैरव मंदिर, गर्डाहिंग्लज, दि. ०९/०८/२०१५.
४) दैनिक सकाळ : उपरोक्त कित्ता.
५) नाईक-चव्हाण, इतिहासलेखनातील नवा प्रवाह: प्रादेशिक इतिहास, विद्यावती प्रकाशन लातुर, २०१५, पा.नं. १४९.
६) हिरण्यकेशीच्या काठी, उपरोक्त कित्ता.
७) दैनिक सकाळ, पर्यटन विशेष पुरवणी, दि. २१/०१/२०१३.
८) दैनिक तरुण भारत, गर्डाहिंग्लज पर्यटन विशेष पुरवणी दि. ०५/०६/२०१६.
९) दैनिक सकाळ, गडहिंग्लज कार्यालय वर्धापन दिन विशेषांक दि. ३०/११/२०१६.
१०) प्रत्यक्ष भेट व मुलाखत (पुजारी गुड्डाई देवी) दि. २२/०५/२०१८.
११) दैनिक सकाळ, उपरोक्त कित्ता दि. ३०/११/२००५.
१२) प्रभाकर गद्रे, भारतातील इतिहास प्रसिद्ध किल्ले, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, २००२, पा.नं. २३६ ते ४०.
13) Resurrection, International Registered and Recognized Research Journal, Belgaum, Vol-7, Issue-I 2014, P.No. 122 to 124.



I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.